सातारा, गुरुवार, २ नोव्हेंबर २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# डी. पी. भोसले कॉलेज ॲथलेटिक्समध्ये अजिंक्य

## कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकीतर्फे विद्यापीठस्तरीय स्पर्धा उत्साहात

**सातारा, ता. १ :** कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने आयोजिलेल्या ५४ व्या शिवाजी विद्यापीठस्तरीय सातारा विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेत पुरुष व महिला गटात कोरेगावच्या डी. पी. भोसले महाविद्यालयाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत वेगवान धावपटू विजय जाधव आणि चैत्राली गुजर हे ठरले. तसेच अशफाक तांबोळी आणि रेश्मा केवटे यांनी अनुक्रमे पुरुष व महिला गटात वैयक्तिक विजेतेपद मिळविले. ही स्पर्धा नुकतीच छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुलात झाली.

यशस्वितांना धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रतिभा गायकवाड यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. त्यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. शिवाजीराव सांगळे, प्रा. दिलीप पवार, प्रा. संभाजी पाटील, युवा ॲकॅडमीचे अध्यक्ष विश्वास मोरे, डॉ. दीपक पाटील, प्रा. समीर पवार, प्रा. अशोक चव्हाण, प्रा. सुनील खरात, प्रा. दत्ता गायकवाड, प्रा. बाळकृष्ण भोसले आदी उपस्थित होते. यावेळी प्राचार्या गायकवाड म्हणाल्या, ''मनुष्य निरोगी असेल तर यश मिळविता येते. निरोगी राहण्यासाठी खेळाशिवाय पर्याय नाही. शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले असेल तर स्पर्धेत यश संपादित करणे शक्य होते. खिलाडीवृत्ती व सांघिक प्रयत्नांना खूप महत्त्व असते. ज्या खेळाडूंना यश मिळाले नाही त्यांनी खचून जाऊ नये. अपयश हे यशाची पहिली पायरी आहे. अपयशावर मात करण्यासाठी खेळाडूंनी कठोर परिश्रमाची तयारी ठेवावी.''

सातारा विभागीय क्रीडा परिषदेचे सचिव प्रा. दिलीप पवार यांनी आभार मानले.




**सातारा : ॲथलेटिक्स स्पर्धेतील यशस्वितांसमवेत डावीकडून दिलीप पवार, डॉ. शिवाजीराव सांगळे, प्रतिभा गायकवाड, प्रा. बाळकृष्ण भोसले आदी.**